# मुलांसाठी 'बुकगंगा'चा रंगतदार वाचनकट्टा



**बुकगंगा इंटरनॅशनल बुक सर्व्हिसच्या दालनामध्ये रंगलेला वाचककट्टा**

**म. टा. प्रतिनिधी, पुणे**

मुलांनीच उत्साहाने निवडलेली पुस्तके...रंगतदार अभिवाचन...पालक आणि बालप्रेक्षकांची दाद....

निमित्त होते मुलांनी मुलांसाठी आयोजित केलेल्या वाचनकट्टा या कार्यक्रमाचे. बुकगंगा इंटरनॅशनल बुक सर्व्हिसच्या दालनामध्ये हा कार्यक्रम रंगला. ईशान लिमये, श्रेयस दीक्षित, सर्वेश चक्रदेव आणि सई लिमये यांनी हा कार्यक्रम केला. ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या रेणू गावस्कर या वेळी उपस्थित होत्या. प्रकाश आमटे यांचे 'प्रकाशवाटा', 'मलाला', 'डायरी ऑफ द व्हिम्पी किड', 'फेलुदा' यातील निवडक भाग व इंदिरा संत यांची 'अक्कू बक्कू ची दिवाळी' ही कविता या वेळी वाचण्यात आली.

'वाचन मन सुगंधी, समृद्ध करते. त्यासाठी गोष्टी ऐकणे ही वाचनाची सुरुवात असते. त्यासाठी गोष्टी सांगणारे पालक तयार व्हायला हवेत. कारण, नव्या युगात गोष्टी सांगितल्या तर मुलांना वाचनात रुची निर्माण होईल,' असे रेणू गावस्कर यांनी सांगितले.